MHST200028132020

## वि.दि.दा.क्र.५२९/२०२३ मधील निशाणी क्र.१४२ वरील आदेश

वादीने सदरचा अर्ज त्याचेविरुद्ध झालेला पुरावा बंद आदेश रद्द होवुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्रासोबत नि.क्रं.१४० वर कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे म्हणणे देणेसाठी काम प्रलंबीत असताना वादीचा पुरावा बंद करण्याचा आदेश नि.क्रं.१ वर झालेला आहे. नि.१४० वरील अर्जावर म्हणणे दाखल केल्यानंतर वादीचा जादा सरतपास नोंदविला जाणार असलेची समजुत वादीची होती. त्यामुळे सदर नेमलेल्या तारखेस वादीतर्फे साक्षीदार हजर नव्हता. त्यामुळे, दि.०६.०२.२०२६ रोजी पुरावा बंद आदेश नि.क्रं.१ येथे करणेत आलेला आहे. सदरचा आदेश रद्द होऊन न मिळाल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

३. सदर अर्जावर प्रतिवादी क्रं.६ ते ८ यांनी म्हणणे देवुन योग्य ते आदेश पारीत करणेत यावे असे कथन केले.

४. अर्जाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. सदर दावा खरेदीपत्र करुन मिळणेसाठी, जाहीर ठराव व निरंतर ताकिदीसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत दाव्यात दि.२५.११.२०१६ रोजी नि.क्रं.७३ नुसार मुद्दे निश्चीत करण्यात आलेले आहेत. वादीने त्याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि.१२.०८.२०२५ रोजी नि.क्रं.१३४ वर दाखल केलेले आहे. त्यानंतर वादी

उलटतपासाकरीता गैरहजर राहिल्याने सदरचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन घेण्यात आले. त्यानंतर त्याला वारंवार संधी देवुनही त्याने पुढील पुरावा दिलेला नसल्याने दि.०६.०२.२०२६ रोजी त्याचेविरुद्ध पुरावा बंदचा आदेश नि.क्रं.१ वर पारीत करणेत आला. त्यानंतर वादीने सदरचा अर्ज दि.२०.०२.२०२६ रोजी दिलेला आहे. त्यामुळे वादीला १४ दिवसांचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. सदरचा दावा सन २०११ सालचा असुन १५ वर्षे जुना आहे. परंतु, सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत वादी यास याच न्यायालयात त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. उलटपक्षी त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्याला न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्याला याकामी पुरावा देण्यास परवानगी देणे न्यायोचित वाटते. परंतु, झालेल्या विलंबाबाबत वादीने खर्चाची रक्कम देण्याबाबत आदेश पारीत करणे आवश्यक वाटते. परिणामी, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम ₹. ३००/- (तिनशे रुपये फक्त) प्रतिवादी क्रं.६ ते ८ यांना दयावी.

३. वर नमूद रक्कम जमा केल्यानंतर वादीविरुद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येतो व त्याला पुरावा देण्याची संधी देण्यात येते.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.03.07 16:04:36 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : ०६/०३/२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.